
आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । मंगळवार, ३० मार्च २०२१ । वर्ष : ३ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — अंक : २३ । पाने : ४ । मूल्य २ ₹




अभंग आणि कीर्तनातून समाज मनावरील अंधश्रद्धेचा पगडा दूर करणारे थोर सत्पुरुष जगद्गुरू संत श्री.तुकाराम महाराज यांना 'तुकाराम बीज' दिनी आदरपूर्वक नमन।

## व्हॉलीबॉलमध्ये आनंदगावचा संघ देशात अव्वल

### ग्रामीण टॅलेंट राष्ट्रीयस्तरावर चमकले; कर्णधार निकीता थावरेची कर्तबगारी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धेत माजलगाव तालुक्यातील आनंदगाव येथील जिल्हा परिषद शाळेचा संघ देशात अव्वल ठरला आहे. काहारगोड-केरळ येथे झालेल्या राष्ट्रीय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धेत ग्रामीण टॅलेंट असलेल्या विद्यार्थिनींनी नेत्रदीपक कामगिरी केली आहे. राष्ट्रीयस्तरावर कर्णधार निकिता थावरेने मिळवलेले यश बीड जिल्ह्याची मान उंचावणारी आहे.

राष्ट्रीय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धा केरळ राज्यातील कासारगोड, उदमा येथे दि.२८ व २९ रोजी घेण्यात आल्या. यात माजलगाव तालुक्यातील आनंदगाव जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले. येथील विद्यार्थिनी निकिता शिवाजी थावरे कर्णधार असलेल्या युथ गट मुलींचा संघ देशात प्रथम आला असून पहिला सामना आंध्रप्रदेश सोबत २-० ने, दुसरा सामना कर्नाटक सोबत २-० ने, तिसरा सामना तमिळनाडू सोबत २-० ने, चौथा सामना छत्तीसगढ सोबत २-१ ने जिंकला आहे. तर आतिशय अटीतटीच्या फायनल सामन्यामध्ये महाराष्ट्राच्या प्रणिता थावरेने उत्कृष्ट खेळ सादर करीत महाराष्ट्राकडे विजय खेचून आणला.

याशिवाय मिनी गट मुले हा संघ देशात द्वितीय आलेला असून या संघाचे नेतृत्व हर्षवर्धन हनुमान थावरे याने केले. कर्णधार रूपाली नामदेव साखरे हिच्या नेतृत्वाखाली मिनी गट मुली या संघाने देशात तृतीय क्रमांक पटकावला तर रूपाली नामदेव साखरे व कार्तिक केशव साखरे यांनी मिनी गट मिश्र दुहेरीत देशात द्वितीय क्रमांक पटकावला. कर्णधार कोरडे प्रमोद रामेश्वर यांच्या नेतृत्वाखाली युथ गट मुले देशात द्वितीय आलेला आहे. ही सर्व मुले माजलगाव तालुक्यातील ग्रामीण भाग असलेल्या आनंदगाव जिल्हा परिषद शाळेतील असून महाराष्ट्र संघाचे प्रशिक्षक म्हणून राज सोनपसारे यांनी मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या मनात स्वप्नांच्या रंगाची उधळण करून खऱ्या अर्थाने धुलीवंदन घडवून आणणाऱ्या आदर्श गुरूंचे व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन आशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. या सर्व खेळाडूंचे गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर, केंद्रप्रमुख बलशेटवार, केंद्रीय मुख्याध्यापक अशफाख, मुख्याध्यापक एस.एस.राठोड, गंगाधर वानोळे, भालचंद्र खुर्पे, जिजाराम खुडे, बी.डी.राठोड, भंडारी, नायबळ, धपाटे, श्रीमती पाचनकर, श्रीमती साळुंखे आदी शिक्षकांनी अभिनंदन केले.



## फास्टट्रॅकन्यूज

### महाविकास आघाडीत मतभेद नाहीत : आरोग्यमंत्री राजेश टोपे



मुंबई : लॉकडाऊन हा मुख्यमंत्र्यांनाच काय राज्यातील कोणत्याही व्यक्तीला नकोच आहे. मात्र, तशी वेळ आल्यास लॉकडाऊनचा पर्याय वापरावा लागतो. कारण, माणसाच्या जीवापेक्षा कोणतीही गोष्ट मोठी नसते, असे वक्तव्य राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी केले. दरम्यान, महाविकास आघाडीत कसलेच मतभेद नाहीत असे स्पष्टीकरण आरोग्यमंत्र्यांनी दिले. राजेश टोपे यांनी एका वाहिनीशी संवाद साधला. यावेळी त्यांनी वेळ पडल्यास लॉकडाऊनचा पर्याय नाईलाजाने का होईना पण अंमलात आणावा लागेल, असे संकेत दिले.

### 'पोलीस बॉईज'च्या मराठवाडा उपाध्यक्षपदी बालासाहेब फपाळ



बीड : पोलीस बॉईज असोसिएशनच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी बालासाहेब फपाळ पाटील यांची निवड करण्यात आली. सदरील निवड संघटनेचे अध्यक्ष रवी वैद्य यांनी प्रदेशाध्यक्ष विकास सुसर, मराठवाडा अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासोबत चर्चा करून केली. या निवडीबद्दल महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विकास सुसर, पैठण तालुका अध्यक्ष सचिन काळे, बाबा देशमाने, भगीरथ तोडकरी, गोवर्धन बडे, दत्ता आळणे, धारूर तालुकाध्यक्ष बाळासाहेब सोनटक्के, उद्धव महाराज ठोंबरे, मारुती महाराज सुरवसे, कालिदास महाराज नाईकनवरे, संतोष महाराज सोळंके, बाळासाहेब सांगळे, बाळासाहेब डांगे, दत्ता सोळंके यांनी अभिनंदन केले.

### रानडुकराचा हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी

माजलगाव :पवारवाडी येथील शेतकरी मोहन रामभाऊ धुमाळ (वय ४२) हे त्यांच्या शेतात सोमवार दि.२९ रोजी दुपारी १ वाजेदरम्यान नेहमी प्रमाणे जनावरांसाठी मका काढण्यासाठी गेले असता रानडुक्कर मक्काच्या दुसऱ्या पातीला दबा धरून बसले होते. त्याने अचानक मोहन धुमाळ यांच्या अंगावर धावून आले, अन् त्यांच्यावर हल्ला केला त्यात त्यांच्या छातीला दात लागून गंभीर जखमी केल्याने त्यांना पुढील उपचारासाठी दवाखाण्यात दाखल केले.

# शहा-पवार भेटीचे गूढ वाढले

## तर्कवितर्कांना उधाण; राष्ट्रवादीकडून मात्र खंडन

▶ प्रतिनिधी

मुंबई : भाजपचे नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची शुक्रवारी रात्री अहमदाबादमध्ये गुप्त भेट झाल्याचे वृत्त एका गुजराती दैनिकाने दिल्याने महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात तर्कवितर्काला उधान आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने मात्र या भेटीचे खंडन केले आहे.

गुजरातमधील एका प्रादेशिक दैनिकाने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि शरद पवार यांची भेट अहमदाबादमध्ये झाल्याचे वृत्त दिले आहे. शरद पवार हे राजस्थानमधील जयपूरमध्ये एका कार्यक्रमाला गेले होते. ते एकदिवसाआधी



खासगी विमानाने अहमदाबादला आले होते. राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांच्यासह एका उद्योगपतीच्या विश्राम गृहावर ही भेट झाल्याचा दावा या वृत्तात करण्यात आला आहे. दरम्यान राष्ट्रवादीचे नेते आणि अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांनी हे वृत्त फेटाळून लावले आहे. शरद पवार



आणि प्रफुल्ल पटेल हे अहमदाबाद येथून एकत्र आले होते. पण, ते कुणालाही भेटले नाही. गुजरातच्या दैनिकाने हे खोडसाळ वृत्त दिले आहे.

हे भाजपचे षडयंत्र आहे. ही बातमी निव्वळ अफवा आहे. मात्र भाजप नेते अमित शहा यांनी सर्व काही सार्वजनिक करता येऊ शकत नाही', अशी सूचक प्रतिक्रिया दिल्याने या भेटीबाबत गुढ अधिक वाढले आहे.

२०१४ नंतर अनेकदा पवार-मोदी यांच्यात भेटी झाल्या आहेत. या दोन नेत्यांमध्ये जसे व्यक्तिगत संबंध आहेत तसे शहा-पवार यांच्यात नाही, पवार यांनी अनेकदा शहा यांच्या कार्यशैलीवर जाहीरपणे टीका केली आहे.

हे लक्षात घेतले तर पवार-शहा यांना भेटले असतील तर त्याला अधिक महत्त्व आहे, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. सध्या राज्यात अस्थिर राजकीय स्थिती आहे. माजी पोलीस आयुक्त परमबिर सिंग यांनी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर केलेले आर्थिक देवाण-घेवाणीचे आरोप, उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या घराजवळ स्फोटक असलेली गाडी सापडणे, या गाडीच्या मालकाचा संशयास्पद मृत्यू होणे आणि या प्रकरणात सहायक पोलीस निरीक्षक सचिन वझे यांचा सहभाग उघड होणे या एकूणच घटनाक्रमांनी राज्य सरकार हादरले आहे.

राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी मागणी भाजपने लावून धरली आहे. या प्रकरणाचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणा एनआयए करत आहे. दुसरीकडे खासदार मोहन डेलकर आत्महत्या प्रकरणावरून महाविकास आघाडी सरकारने भाजपची कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे.

# राज्यात जमावबंदीचे आदेश : मुख्यमंत्री

▶ प्रतिनिधी

मुंबई : राज्यात कोरोना रुग्णांची वाढलेली संख्या लक्षात घेता गर्दी टाळणे, वाढत्या संसर्गाला रोखण्यासाठी काही कडक उपाययोजना लागू करणे आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे नाईलाजाने गरजेचे ठरत असल्याने संपूर्ण राज्यात रविवारी (दि.२८ मार्च) रात्रीपासून जमावबंदी लावण्याच्या सुचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिल्या. यासंबंधीचे स्वतंत्र आदेश आजच मदत व पुनर्वसन विभागाकडून निर्गमित व्हावेत असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीसर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस अधीक्षक, जिल्हा शासकीय रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन, जिल्हा तसेच राज्य टास्क फोर्सचे सदस्य, वैद्यकीय महाविद्यालयांचे अधिष्ठाता यांच्याशी संवाद साधून कोविड स्थिती, करण्यात येत असलेल्या



उपाययोजना जाणून घेतल्या त्यावेळी ते बोलत होते. यावेळी दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून आरोग्य मंत्री राजेश टोपे तर वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, माजी मंत्री डॉ.दीपक सावंत, मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंग, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव,मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव प्रदीप व्यास, वैद्यकीय शिक्षण सचिव सौरभ विजय मुख्यमंत्र्यांचे सचिव आबासाहेब जऱ्हाड, बैठकीस उपस्थित होते.






## संपादकीय

# कोकणी मेव्याला हवी ब्रँडिंग

महाराष्ट्रातील कोकण प्रांत जसा सर्वांगसुंदर नटलेला आहे तितकीच विविधता तेथील खाद्यपदार्थांमध्ये दिसून येते, मात्र पाहीजे तेवढी ब्रँडिंग न झाल्याने कोकणी मेवा दुर्लक्षित होत आहे. कणातील फलोत्पादने आणि त्यातून समृद्ध झालेली अशी एक स्वतंत्र खाद्यसंस्कृती आहे. जी विविध ठिकाणच्या खवय्यांच्या पसंतीस उतरलेली आहे. मात्र, प्रत्यक्ष कोकणात गेल्यावर पर्यटकांना हे पदार्थ किती सहजपणे उपलब्ध होतात की नाही हे एक कोडेच आहे. अगदी कोकण महोत्सव' असे नाव असणाऱ्या कार्यक्रमांतही जेव्हा कच्छी दाबेली, पावभाजी वगैरे पदार्थ ठेवले जातात तेव्हा हा दोष केवळ सरकारचाच नाही, तर स्थानिक जनतेचाही आहे, हे लक्षात येते. हेच जर केरळसारख्या राज्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेऊन कोकणात या स्थानिक उत्पादनांना चालना दिली गेली असती, तर नक्कीच कोकणच्या अर्थकारणात आमूलाग्र बदल पाहायला मिळाले असते. त्यामुळे गरज निर्माण होते ती पर्यटन विकासासाठी व्यापक दृष्टिकोन, तो राबविण्याची इच्छाशक्ती असणारे राजकीय नेतृत्व, पर्यटनाशी लांबून-दुरुन संबंध येणाऱ्या अन्य प्रशासकीय विभागांचा उत्तम समन्वय आणि त्याच जोडीने या प्रक्रियेत स्थानिक लोकसहभागाचा. कोकण हे एक पर्यटकांसाठी सहज उपलब्ध होणारे आणि आवडते ठिकाण आहे. इतर ठिकाणांच्या तुलनेत मुंबईपासून जवळ असणाऱ्या कोकणात जाणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. कोकणातली शांतता आणि निसर्ग अनुभवण्यासाठी पर्यटनस्थळांना जास्त पसंती दिली जाते, तर इतर साहसी खेळांसाठी प्रामुख्याने सिंधुदुर्ग बीचची निवड केली जाते. तसेच काही इतिहासप्रेमी सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, मुरुड-जंजिरा यांची निवड करतात. कमी वेळात आणि कमी खर्चात निसर्गाचा अनुभव घेण्यासाठी पर्यटक कोकणला पसंती देताना दिसतात. गेल्या दहा वर्षांपासून पर्यटकांच्या कोकण पर्यटनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. जगभर फिरून आलेले अनेक पर्यटकही आवर्जून कोकणात अनेकदा भेट देताना दिसतात. ट्रॅव्हल कंपनीच्या पॅकेजबरोबरच कोकणात वैयक्तिकरीत्या टूर अॅरेंज करण्यालाही अनेक पर्यटक पसंती देतात. आपली खाद्यसंस्कृती ही आपल्या भाषेसारखीच काम करते. भाषेप्रमाणे खाद्यसंस्कृतीही आपल्या एकंदर संस्कृतीची अभिव्यक्ती बनते. त्यातून निर्माण होणारी प्रादेशिक अस्मिता आपली ओळख बनते. ही अस्मिता आणि ओळख ही आपली मानसिक गरज असते कारण ती आपल्याला सुरक्षितपणाची, सुस्थिरतेची भावना देते. जसा वडापाव किंवा भेळपुरी म्हटल्यावर सगळ्या मुंबईकरांना जोडणारा, तर सुकं मटण, तांबड्या-पांढऱ्या रश्शाच्या वाट्या ही कोल्हापूरची ओळख सांगून जाते. मग उकडीचा मोदक, शिरवाळे, वडे-सागोती, काळ्या वाटाण्याची उसळ, घावणे ही कोकणाची ओळख होऊ शकते की नाही? मग प्रत्येक प्रदेशाची, आपली स्वतःची ओळख असलेली एक अस्सल खाद्यसंस्कृती, काही टिपिकल खाद्यप्रकार, मसाले जेवण बनवण्याच्या पद्धती, जेवण वाढण्याच्या पद्धती आणि बदलत्या ऋतूनुसार किंवा वातावरणानुसार बदलत जाणाऱ्या खाद्यपद्धती सुद्धा आपण बघू शकतो. याची चांगली बाजू अशी की, या प्रादेशिक ओळखीला आज सन्मान मिळू लागलेला आहे. प्रादेशिक खाद्यसंस्कृती स्वीकारली जात आहे आणि ती शोधली जात आहे. दुर्मिळ होत नष्ट होऊ पाहणाऱ्या एखाद्या धान्याच्या वाणाप्रमाणे हे पदार्थ त्याच्या सन्माननीय ओळखीसह टिकवण्याची गरज ओळखली जाऊ लागली आहे. काही वेळा संस्कृतीची गरज प्रवाहीपणाची नसते, तर ती आहे तशी टिकवून ठेवण्याची असते. त्यासाठी अनेक महोत्सव आणि घटनांची आपल्याला गरज भासते. आजच्या जगात पेटंट आणि जीआय टॅग हीच गरज भागवताना दिसतात. नारळीभात हे कोकणचे वैशिष्ट्य सांगता येईल. याशिवाय सोलकढी, डाळिंबाची उसळ, नाचणीचे वडे, कोंबडी वडे, असे असंख्य पदार्थ कोकणी खाद्यसंस्कृतीचे वैशिष्ट्य टिकवून आहेत. कर्नाटकात जाऊन आलेल्या पर्यटकांकडून तिथल्या पर्यटन सुविधा, रस्ते, हॉटेल्स, आदींबाबत ज्या प्रतिक्रिया येतात त्यावरून याची कल्पना येते. केएसटीडीसीची तर आज पलीकडे यामध्ये अतिथी देवो भव' कॅम्पेनलाही थोडाफार वाटा द्यावा लागेल, कारण पर्यटक आला, त्यातही जर विदेशी पर्यटक आला की, त्याला पार लुबाडून काढण्याची वृत्ती अतिथीच्या सुंदर व मनाला भिडणाऱ्या कॅम्पेनमुळे थोड्याफार प्रमाणात कमी झालेली दिसते. हे सगळं होत असताना आपण महाराष्ट्रात मात्र अजून एखादं हिलस्टेशन किंवा बीच, तिथे रिसॉर्ट, घसरगुंड्या, घोड्यावरून रपेट, तेच ते पंजाबी किंवा चायनीस जेवण, मक्याची कणसं आणि पाणीपुरी याच्यापलीकडे जाताना दिसत नाही. जेव्हा एखाद्या प्रदेशात पर्यटन विकसित होतं तेव्हा केवळ तिथली हॉटेल्स विकसित होत नाहीत, तर आसपासच्या प्रदेशातील कृषी व फलोत्पादने, त्यांच्यावर प्रक्रिया केलेले पदार्थ, स्थानिक वैशिष्ट्य असणाऱ्या वस्तू, हस्तकला इत्यादींची बाजारपेठ विकसित होते, या बाजारपेठेच्या गरजेतून कुशल कारागीर, कामगारांची संख्या वाढते, रिक्षा-टॅक्सी आदी व्यवसाय विकसित होतात, अन्य लहान मुलांची छोटी-मोठी खेळणी अशा असंख्य घटकांची ती एक मोठी साखळी प्रक्रिया असते. यातून त्या त्या प्रदेशात समांतर अर्थव्यवस्था उभी राहते. अशी समांतर अर्थव्यवस्था आणि त्यातून रोजगारनिर्मिती करण्यात आपण अद्याप बरेच पिछाडीवर आहोत. मुंबई-पुण्यापासून तीन-चार तासांच्या अंतरावर असलेल्या कोकणाचेच उदाहरण घेतले, तर हीच बाब ठळकपणे दिसून येते. यासाठी त्याचे आत्मपरीक्षण करण्याची आज गरज आहे. कोकणातील खाद्यपदार्थ संस्कृतीला चालना देण्यासाठी भूमिपुत्रांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

# राष्ट्रपती राजवटीची टांगती तलवार?

**सचिन वाझेंची अटक आणि त्यानंतर मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्या पत्रामुळे महाराष्ट्रातलं राजकारण तापलंय. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि पर्यायाने ठाकरे सरकारला खिंडीत पकडायचा प्रयत्न विरोधक करतायत. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होतोय. फक्त एखाद्या मंत्र्याने भ्रष्टाचार केला किंवा एखाद्या अधिकाऱ्याने तसे आरोप केले म्हणून 'राष्ट्रपती राजवट' लागू होऊ शकते?**

विशेष

**अर्जुन नलवडे**



मुकेश अंबानी यांच्या घराबाहेर सापडलेल्या जिलेटिनच्या मागे एखादी दहशतवादी संघटना असावी अशी शक्यता होती. अशातच स्फोटकं असलेल्या स्कॉर्पिओचा मालक मनसुख हिरेनचा मृतदेह संशयास्पदरित्या मुंब्राच्या खाडीत सापडला. प्रकरण थेट ठाकरे सरकारच्या कामगिरीवर शिंतोडे उडण्यापर्यंत पोचले. सचिन वाझेंना अटक केल्यानंतर दररोज समोर येणारी नवनवीन माहिती, पोलिस अधिकारी परमबीर सिंग यांची तातडीने केलेली बदली, गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर केलेले भ्रष्टाचाराचे आरोप, या सर्व मुद्द्यावर भाजपने राज्याच्या आणि केंद्राच्या दोन्ही सभागृहात चांगलंच रान उठवले. महाराष्ट्रात 'कायदा आणि सुवस्थे'चा प्रश्न निर्माण झाला असल्यामुळे भाजप नेत्यांनी 'राष्ट्रपती राजवटी'ची मागणी केली. केवळ एखाद्या मंत्र्याने भ्रष्टाचार केला किंवा एखाद्या अधिकाऱ्याने भ्रष्टाचाराचे आरोप केले म्हणून राज्यात 'राष्ट्रपती राजवट' लागू होऊ शकते का?

राष्ट्रपती राजवटीची चार कारणे

चार प्रमुख कारणांनी राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस राज्यपाल देशाच्या राष्ट्रपतींकडून करू शकतात. पहिलं कारण, संविधानानुसार राज्यात सरकार स्थापन झालेलं नसेल तर. दुसरं कारण, स्थापन झालेलं सरकार संविधानानुसार काम करत नसेल तर. तिसरं कारण, सरकारला स्पष्ट बहुमत नसेल किंवा असलेलं बहुमत सरकारने गमावलं असेल तर राष्ट्रपती राजवट लावता येते. त्यातलं चौथं कारण म्हणजे केंद्राने दिलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची राज्य सरकार अंमलबजावणी करत नसेल तर. या चार प्रमुख कारणांना विचारात घेऊन राज्यपाल राष्ट्रपतींना 'राष्ट्रपती राजवट' लागू करण्याची विनंती करतात. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने राष्ट्रपती हा निर्णय घेतात.

राजवटीचा काळ किती?

राज्यपालांच्या शिफारसीनुसार राष्ट्रपतींना राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली, तर साधारणपणे तात्पुरती राजवट लावली जाते. त्याचा कालावधी २ महिन्यांपर्यंत असतो. त्यानंतरही राष्ट्रपती राजवटीचा कार्यकाळ वाढवायचा असेल तर केंद्र सरकार संसदेत तसा ठराव मांडते. केंद्र सरकारने मांडलेल्या ठरावाला मंजुरी मिळाली तर, राष्ट्रपती राजवटीचा कार्यकाळ आणखी वाढू शकतो. तो ६ महिन्यांपर्यंतही वाढवला जाऊ शकतो किंवा तीन वर्षांसाठीही वाढवला जाऊ शकतो. त्यानंतर फेर निवडणुका घेतल्या जाऊ शकतात.

अंतिम निर्णय केंद्राचाच

राज्यपालांनी राष्ट्रपतींना केलेली शिफारस मान्य झाली तर, राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होते. या काळात पुढील गोष्टी होतात. केंद्राचा प्रतिनिधी म्हणून राज्याचा कारभार थेट राज्यपालांकडे जातो. राज्य चालवण्यासाठी त्यांच्या मदतीला तीन आयएएस दर्जाचे अधिकारी दिले जातात. त्यात राज्याचे मुख्य सचिव असतात. राष्ट्रपती राजवटीच्या काळात हे अधिकारी सल्लागार म्हणून काम पाहतात. राज्याचे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचा अधिकार केंद्राकडे जातो. अशावेळी राज्यपालांची सूचना महत्वाची असते. नवी योजना किंवा नवा खर्च करण्याचा अधिकार राज्यापालांना या काळात असत नाही. मात्र जीवनावश्यक प्रश्नांवर निर्णय राज्यपाल घेऊ शकतात.

महाराष्ट्राचा इतिहास काय सांगतो?

आतापर्यंत महाराष्ट्रात तीन वेळा राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आलीय. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात १९८० साली महाराष्ट्रात 'पुरोगामी लोकशाही दला'ची सत्ता होती. मात्र, हे सरकार बरखास्त झालं. त्यावेळी महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. २०१४ ला राज्यात आघाडी सरकार होतं. त्यातून राष्ट्रवादी काँग्रेस बाहेर पडली. त्यावेळी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी राजीनामा दिला होता. तेव्हा काही काळासाठी राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. त्यानंतर १२ नोव्हेंबर २०१९ ला भाजप आणि शिवसेना या दोन्ही पक्षांनी सरकार स्थापन करायला नकार दिला. त्यानंतर राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस राज्यपालांनी केली होती.

राजवटीच्या मागणीतल्या अडचणी

परमबीर सिंग यांनी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्यावरून राज्यात भाजपचे नेते प्रकाश जावडेकर, नारायण राणे, गिरीश बापट, पूनम महाजन, अपक्ष खासदार नवनीत राणा, वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांनी राज्यात 'राष्ट्रपती राजवट' लागू करण्याची मागणी लावून धरलीय. राजकीय विश्लेषकांच्या म्हणण्यानुसार राष्ट्रपती राजवट लागू करण्यासाठी ठोस कारण असावं लागतं. एखाद्या मंत्र्याने भ्रष्टाचार केला किंवा एखाद्या अधिकाऱ्याने मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले, म्हणून राष्ट्रपती राजवट लागू करण्यासाठी ठोस कारण असू शकत नाही. सध्या राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालाय, असं वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. येत्या काही दिवसांत हा प्रयत्न विरोधी बाकावरून आणखी जोर धरू शकतो. अशा परिस्थितीत महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू झाली तर काही अडचणी निर्माण होतील. पहिली अडचण अशी की, मुळात राज्यपाल राष्ट्रपतींकडे राजवटी शिफारस करतील का? राष्ट्रपतींकडून ही शिफारस मान्य करण्यात येईल का? या अडचणींतून राष्ट्रपती राजवट लागू झालीच तर, पुन्हा सुप्रीम कोर्ट राजवट योग्य असल्याचा निर्णय देईल का? अशा अडचणींचा सामना राष्ट्रपती राजवटीच्या मागणीला करावा लागेल.

# हॉलमार्कचे महत्त्व



**केंद्र सरकारने १ जून २०२१ पासून सोन्याच्या दागिन्यांवर हॉलमार्किंग सक्तीचं केलंय. आता देशातल्या कोणत्याही विक्रेत्याने हॉलमार्क नसलेले दागिने विकले तर त्याला मोठी शिक्षा केली जाईल. ग्राहकांची फसवणूक थांबवण्यासाठी हा निर्णय घेतला गेलाय. भारतातलं सोन्याचं महत्त्व लक्षात घेता त्यावर बंधनकारक असणाऱ्या या हॉलमार्किंगचीही बाराखडी समजून घ्यायला हवी.**

उद्योगवार्ता

**रेणुका कल्पना**

सोनं म्हणजे भारतीयांचा जीव की प्राण. भारतात सोन्याला अतिशय महत्त्व आहे. सोनं कितीही महाग झालं तरी त्यावर भारतात लोक खूप पैसे खर्च करतात. त्यातही सणावाराला, लग्न कार्याला घरातल्या बाईच्या अंगावर सोन्याचे दागिने हवेच असतात. गुंतवणूक करण्याचा सगळ्यात चांगला पर्याय म्हणूनही भारतीय सोन्याच्या दागिन्यांकडे पाहतात. त्यामुळेच या दागिन्यांच्या खरेदी विक्रीबाबतचा कोणताही नियम भारतीयांसाठी महत्त्वाचा असतो. १ जून २०२१ पासून सोन्याच्या सगळ्या दागिन्यांवर हॉलमार्क असणं सक्तीचं झालंय. १ जूनपासून १४, १८ आणि २२ कॅरेटचे आणि हॉलमार्क असलेले दागिनेच विक्रेत्यांना विकता येतील, असा नियम केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार विभागाने लागू केलाय. खरंतर जानेवारी २०२० लाच हा निर्णय घेण्यात आला होता. सगळ्या दागिने विक्रेत्यांना नोंदणी करण्यासाठी एक वर्षाचा वेळ देऊन १५ जानेवारी २०२१ पासून हॉलमार्क सक्तीचं होणार होतं. पण १९ मार्चला ही मुदत वाढवली. या निर्णयामुळे ग्राहकांमधे गोंधळाचं वातावरण निर्माण झालंय. हॉलमार्किंग म्हणजे नेमकं काय? ते ओळखायचं कसं? ग्राहकांनी आधीच विकत घेतलेल्या दागिन्यांवर हॉलमार्क नसेल तर त्याचं काय होणार? असे अनेक प्रश्न पडतायत. म्हणूनच या हॉलमार्किंगची बाराखडी समजून घ्यायला हवी.

हॉलमार्किंग म्हणजे काय?

सोने, चांदी, प्लॅटिनम आणि काही देशांमधे पॅलाडियम या धातूंपासून बनवलेल्या वस्तूंवर त्याच्या शुद्धतेचं प्रमाणपत्र देणारा एक मार्क किंवा स्टॅम्प दिलेला असतो. अनेकदा एकापेक्षा जास्त मार्कही असतात. मौल्यवान धातू विकणारा विक्रेता त्या धातूच्या शुद्धतेबद्दल जी माहिती सांगतोय ती खरी आहे हे या मार्कवरून स्पष्ट होतं. भारतात सोन्याच्या दागिन्यांवर बीआयएस हॉलमार्क वापरला जातो. बीआयएस म्हणजेच ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड या राष्ट्रीय दर्जाच्या संस्थेने घालून दिलेल्या नियमांत हा दागिना बसतो, असा त्या हॉलमार्कचा अर्थ होतो. एप्रिल २००० पासून याची सुरवात झाली. गेल्या काही वर्षापासून काही मोठे ज्वेलर्स आपले सगळे दागिने हॉलमार्क करूनच विकत होते.

बीआयएसचे ४ स्टॅम्प

या बीआयएस हॉलमार्कमधे ४ प्रकारचे स्टॅम्प असतात. पहिला, बीआयएस या संस्थेचा लोगो. दुसरा, सोन्याची कॅरेटमधली शुद्धता. यात २२ कॅरेट सोन्यासाठी २२घ९१६, १८ कॅरेटसाठी १८घ७५० आणि १४ कॅरेटसाठी १४कघ५८५ असे शब्द वापरले जातात. सोन्याची शुद्धता दोन प्रकारात मोजली जाते. एकतर कॅरेटमधे आणि दुसरं शुद्धतेचा क्रमांक.

२४ कॅरेट हे सोन्याचं शुद्ध रूप अतिशय मऊ असल्याने त्याचे दागिने बनवण्यासाठी चांदी किंवा झिंकसारख्या धातूंचा वापर करावा लागतो, हे आपण शिकलोय. त्यामुळे २२ कॅरेट सोनं याचा अर्थ २४ पैकी २२ सोनं आणि २ कॅरेट इतर धातू वापरलाय. तर शुद्धतेचा क्रमांक हा प्रत्येक हजार युनिटमागे मोजला जातो. म्हणजे, २२ कॅरेट सोन्यात ९१६ युनिट सोनं आणि उरलेल्या भागात इतर धातू असे हे शब्द आपल्याला डिकोड करता येतील. बीआयएस हॉलमार्किंगमधे तिसरा मार्क असतो तो दागिना ज्या हॉलमार्किंग सेंटरमधे चाचणी होऊन बाहेर आलाय त्याचा लोगो किंवा नंबर आणि चौथा मार्क म्हणजे ज्वेलरचा आयडेंटिफिकेशन मार्क किंवा नंबर. सोन्याच्या दागिन्यांवर शक्यतो आतल्या बाजुला हे बीआयएस हॉलमार्किंग केलेलं असतं.

हॉलमार्किंगसाठी नोंदणी गरजेची

हॉलमार्क असलेले दागिने भारतातल्या सगळ्यांपर्यंत पोचावेत यासाठी २००० पासून भरपूर प्रयत्न केले गेलेत. त्यासाठी ऍसेईंग अँड हॉलमार्किंग सेंटर म्हणजे एएचसीची केंद्रं देशभरात वेगवेगळ्या ठिकाणी उपलब्ध करून दिलीत. विशेषतः खेडेगावात किंवा छोट्या शहरात हे हॉलमार्किंग पोचावं यासाठी प्रयत्न केले जातात. हॉलमार्किंगसाठी लागणाऱ्या खर्चाला सबसिडी उपलब्ध करून देणं, लायसन्स मिळवण्यासाठी रजिस्ट्रेशन फी कमीत कमी ठेवणं अशा अनेक गोष्टी केल्या जातात. बीआयएसच्या वेबसाईटवर अशा ९४६ अधिकृत हॉलमार्किंग सेंटरची यादी दिलीय. जवळपास २५ हजार ज्वेलर्स जोडले गेलेत. बीआयएसचं सर्टिफिकेट असणारा कोणताही ज्वेलर्स या ९४६ पैकी कोणत्याही एका केंद्रावरून आपल्या दागिन्यांवर हॉलमार्क लावता येतो. बीआयएस सर्टिफिकेट मिळवण्याची प्रक्रियाही फार सोपी, ऑनलाईन पद्धतीनं होणारी आहे आणि त्याला लागणारी फीसुद्धा अगदी कमी आहे.

हॉलमार्किंगच्या तीन पायऱ्या

हॉलमार्किंगच्या पद्धतीत तीन पायऱ्या असतात. विक्रेत्याकडून दागिने आले की पहिले आलेल्या दागिन्यांच्या एका बॅचची चाचणी होते. हे दागिने बीआयएसच्या मुलभूत नियमांत बसतात का ते पाहिलं जातं. त्यानंतर त्यातल्या प्रत्येक दागिन्याची शुद्धता तपासणी होते. ही थोडी गुंतागुंतीची प्रक्रिया असते. पहिली प्रत्येक दागिन्याच्या वरच्या भागावर एक तपासणी होते. त्यानंतर दागिन्यातला एक अगदी छोटा तुकडा काढून त्याची तपासणी करतात. त्यानंतर केंद्राकडून सोन्याचे युनिट मोजणारी आणखी एक कडक तपासणी केली जाते. ही सगळी प्रक्रिया पूर्ण व्हायला साधारण ५ ते ६ तास लागतात. त्यानंतरच त्यावर हॉलमार्क केल्याचे स्टॅम्प लागतात. त्यासाठी हाताने ठप्पा मारायचा किंवा आजकाल लेझर मशिनचा वापर केला जातो. मग दागिने केंद्रातून पुन्हा विक्रेत्याकडे पाठवले जातात.

ग्राहकांसाठी हॉलमार्किंग का महत्त्वाचं?

एकदा का हे हॉलमार्किंग दागिन्यांवर झालं की, विक्रेत्याला त्याच्याकडचे दागिने दर्जेदार आहेत हे वेगळं सांगायची गरज पडत नाही. पण खरंतर, हे हॉलमार्किंग ग्राहकांची फसवणूक होऊ नये यासाठी जास्त महत्त्वाचं आहे. अनेकदा काही विक्रेते २२ कॅरेटचे सांगून २० किंवा त्यापेक्षा कमी कॅरेटचेच दागिने विकतात. सध्याच्या ऑनलाईन शॉपिंग जगात तर हा घोटाळा सर्रास चालतो. पण हॉलमार्कमुळे आपण जितके पैसे देतोय त्याच शुद्धतेचं सोनं आपल्याला मिळतंय याची खात्री होते. आपल्याकडे असलेले दागिने आपल्याला नव्या स्टाईलप्रमाणे करायचे असतील किंवा त्यात भर घालायची असेल तेव्हाही या हॉलमार्कचा उपयोग होतो. शिवाय, आपल्याला आपल्याकडचे दागिने विकायचे असतील किंवा त्यावर कर्ज मिळवायचं असेल तर हॉलमार्कमुळे ही प्रक्रिया सोपी होते. म्हणूनच, हॉलमार्क अनिवार्य झाल्यानंतर नेहमी सोन्याचे दागिने घेताना एखादं भिंग ज्वेलर्सकडे मागायचं आणि त्यातून हॉलमार्कचे ४ स्टॅम्प असल्याची खात्री करून घ्यायची. ग्राहक विक्रेत्याकडे बीआयएस रजिस्ट्रेशनचं सर्टिफिकेटही मागू शकतात. याशिवाय, दागिना विकत घेतल्याचं पक्कं बीलही ज्वेलर्सकडे मागायला हवे.

ग्राहकांच्या प्रश्नांची उत्तरं

महत्त्वाचं म्हणजे, २ ग्रॅमपेक्षा कमी वजनाचे सोन्याचे दागिने, सोन्याच्या विटा आणि नाणी यांना हॉलमार्किंग बंधनकारक नाही. त्यातही फक्त सोन्याच्या दागिन्यांची विक्री करणाऱ्यांनाच हॉलमार्किंगचं बंधनं पाळावं लागणार आहे. ग्राहकांकडे असणाऱ्या सोन्याच्या दागिन्यांवर हॉलमार्क नसला तरी चालणार आहे. असे दागिने ग्राहकाला कुणाला भेट म्हणून द्यायचे असतील किंवा ज्वेलर्सलाच पुन्हा विकायचे असतील किंवा ते मोडून नवीन दागिने बनवायचे असतील तर त्यासाठीही हॉलमार्कची गरज नाही. अनेकदा दागिन्यात हॉलमार्किंगचा खर्च वाढतो म्हणून ग्राहकही हॉलमार्किंगकडे दुर्लक्ष करतात. पण बीआयएसच्या अधिकृत वेबसाईटवर दिलेल्या माहितीनुसार एका दागिन्याच्या हॉलमार्किंगसाठी कमीतकमी ३५ रूपये पडतात. तर दागिन्यांच्या एका संपूर्ण बॅचच्या हॉलमार्किंगसाठी जास्तीत जास्त २०० रुपये पडतील. यावर सरकारकडून कर लावला जाईल. त्यामुळे दागिन्यांची किंमत फार तर पाचशे हजाराने वाढेल. बीआयएस कायदा, २०१६ नुसार, हॉलमार्क नसलेले दागिने विकणाऱ्या विक्रेत्याला एक वर्षाचा तुरूंगवास आणि एक लाख रुपयांचा दंड अशी शिक्षा असेल. किती किमतीचे दागिने हॉलमार्कशिवाय विकलेत यावर या दंडाची किंमत पाचपटींपर्यंत जास्त होऊ शकते. त्यामुळेच, विक्रेत्यांनी आणि ग्राहकांनीही टाळाटाळ न करता प्रत्येक दागिन्यावर हॉलमार्किंग लावून घ्यायला हवे.

## माजलगावात 'कडकडीत' लॉकडाऊन!

माजलगाव : बीड जिल्ह्यात लॉकडाऊनचे प्रशासनाकडून आदेश आल्यानंतर माजलगाव शहरात लॉकडाऊनचे कडक पालन केले जात आहे. रविवारी वर्तमान टीमने शहरातील घेतलेला छायांकित आढावा.






# लॉकडाऊन मागे घ्या

## वंचितची तहसिलदारांकडे मागणी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : दहा दिवसांसाठी लागू करण्यात आलेला बीड जिल्ह्यातील लॉकडाऊन हा जीवघेणा असून कोरोनापेक्षा जास्त बळी हा लॉकडाऊनमुळे जात आहे. वंचित बहुजन आघाडीने लॉकडाऊन तात्काळ मागे घ्यावे, अशी आग्रही मागणी केली आहे.

छोटे-मोठे व्यापारी, व्यावसायिक, हातावर पोट असणारे, भाजीपाला उत्पादक, शेतकरी, फळविक्रेते यांच्यावर आत्महत्येची वेळ आलेली असून हा लॉकडाऊन तात्काळ मागे घ्यावे, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे अंकुश जाधव, भारत तांगडे, संदिप फंदे, पंकज पंडित, राजेश विघ्ने यांनी तहसिलदार यांना निवेदन देऊन केली आहे.



## खून प्रकरणातील आरोपीला पाच दिवसांची कोठडी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील आझादनगर भागातील भागवत अशोक आगे (वय ३९) याचा क्षुल्लक कारणावरून चाकूहल्ला करून खून करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी एकास शुक्रवारी ताब्यात घेतले होते. शनिवारी न्यायालयाने त्यास पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

माजलगावातील नवीन बसस्थानक परिसरात शौचालयाजवळ दि.२३ मार्च रोजी भागवत आगे याच्यावर महेश सोळंके, मारोती सोळंके, अशोक सावंत यांनी चाकूहल्ला केला होता. जिल्हा रूग्णालयात उपचारादरम्यान शुक्रवारी भागवत आगे याचा मृत्यू झाला. त्याचा भाऊ विजय आगे याच्या फिर्यादीवरून महेश सोळंके, मारोती सोळंके, अशोक सावंत यांच्याविरुद्ध शहर ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांनी महेश सोळंकेला अटक केली होती. शनिवारी येथील न्यायालयात हजर केल्यावर दि.३१ मार्चपर्यत कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. उर्वरीत दोन आरोपी फरार आहेत.

## मनोज फरके युवा मंचच्या वतीने कोरोनामुक्त होळी



माजलगाव : देशातील कोरोना लवकर जावो, जनता सुख-समाधानात रहावी एवढी प्रार्थना करत रविवारी माजलगाव शहरातील कालिंकानगर येथे मनोज फरके युवा मंचच्या वतीने होळी उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कालिंका मित्र मंडळ, नागरिक, बाल गोपाल आदी.

# गोदावरी पात्रात जलसमाधीला परवानगी द्या

## मोगरा ग्रामस्थांची निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे मागणी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : मोगऱ्यात महावितरणने थकीत लाईट बिलाच्या नावे सार्वजनिक बोरची लाईट कट केली. ग्रामपंचायतची थकीत बाकी भरू शकण्याची ऐपत नाही. गावातील महिलांनी, लेकराबाळांनी, आबालवृद्धांनी रणरणत्या उन्हात आंदोलन केले. तरीही प्रशासनाला काहीही देणेघेणे नसल्याने मोगरा वासियांनी मुख्यमंत्र्याकडे गोदावरीतील प्रस्तावित जलसमाधीला परवानगी द्यावी अशी मागणी तहसिलदारांमार्फत केली आहे.



महावितरणने वसुलीच्या नावाखाली गावातील सार्वजनिक बोरचेही कनेक्शन कट केले. गावातील हातपंप नादुरुस्त केवळ एकच हातपंप सुस्थितीत परंतु त्यालाही दूषित पाणी. कोरोना, गारपीट व अवकाळीच्या हातात हात घालून महावितरण आल्याने मोगरावासियांवर संकटांची मालिकाच कोसळली. आजमितीस गावातील सर्व सार्वजनिक बोरचे विद्युत कनेक्शन कट केलेले आहे. गावात पाणीपुरवठा योजना नसल्याने नळ नाहीत त्यात जुने हातपंप नादुरुस्त गावकऱ्यांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी १७ किमी दूर असलेल्या माजलगावला जावे लागत आहे. तीन दिवसांपूर्वी गावातील महिलांनी रणरणत्या उन्हात ग्रामपंचायत समोर आंदोलन केले ग्रामसेवक बजरंग राठोड यांनी लेखी आश्वासन देऊन सायंकाळी ५ वाजेपर्यंत बोर सुरू करतो असे सांगितले परंतु आंदोलन होऊन पाच दिवस झाले असले तरीही ग्रामसेवक गावात आलेला नाही. गावातील लाईनमन यांचे वागणे संशयास्पद असून संपूर्ण गाव बंद असताना काही ठिकाणी आकड्यावरच वीज सुरू असल्याचे ग्रामस्थांना दिसून आले. ग्रामपंचायतने पाणी द्यावे अन्यथा प्रशासनाने गोदावरीत जलसमाधीस परवानगी तरी द्यावी अशी मागणी गावकऱ्यांनी तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्याकडे केली आहे. यावेळी पवन मोगरेकर, विकास झेटे, दत्ता महाजन यांची उपस्थिती होती.

## नारायणराव मुसळे यांचे निधन

▶ प्रतिनिधी



माजलगाव : येथील आडत व्यापारी रामभाऊ मुसळे यांचे वडील नारायणराव मुसळे (वय ८५ वर्षे) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दि.२७ मार्च २०२१ रात्री २ वाजता निधन झाले. माजलगाव येथील मंगलनाथ स्मशानभूमीत दि.२७ मार्च रोजी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. नारायणराव हे अंत्यत शांत, संयमी, मनमिळाऊ, धार्मिक, वयोवृध्द सर्वांचे मार्गदर्शक होते. यांच्या पश्चात रामभाऊ एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे, पथंवडे असा परिवार आहे. मुसळे परिवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान परिवार सहभागी आहे.




## लोकनेते सुंदरराव सोळंके कारखान्याची ऑनलाईन वार्षिक सर्वसाधारण सभा

▶ प्रतिनिधी

माजलगाव : लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याची सन २०१९-२० या आर्थिक वर्षाची ३१ वी अधिमंडळ वार्षिक सर्वसाधारण सभा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन पद्धतीने शनिवारी पार पडली.

शासनाच्या आदेशानुसार ऑनलाईन पद्धतीने शनिवार, दि.२७ रोजी कारखान्याचे चेअरमन धैर्यशील सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी १ वाजता कारखाना कार्यस्थळावर ऑनलाईन सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. परंतु सभेसाठीचा आवश्यक कोरम पूर्ण न झाल्याने पोटनियमातील तरतुदीनुसार दोन तास सभा पुढे ढकलण्यात येऊन सभेचे कामकाज दुपारी ३ पासून सुरू करण्यात आले. या सभेमध्ये विषयपत्रिकेवरील विषय १ ते ११ सर्वानुमते मंजूर करण्यात आले. सभेच्या प्रारंभी कारखान्याचे संस्थापक दिवंगत सुंदरराव सोळंके यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार संचालक प्रकाश शिंदे यांनी केले. या प्रसंगी कारखान्याचे सर्व संचालक सभासद यांनी सभेच्या कामकाजात ऑनलाईन सहभाग नोंदवला. यावेळी कार्यकारी संचालक एम.डी.घोरपडे यांच्यासह सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.



# गोमंतकीय नाट्यचळवळीची वाटचाल

**२७ मार्च जागतिक रंगभूमी दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने गोमंतकीय रंगभूमीचा घेतलेला आढावा प्रविण मराठे यांच्या शब्दांत वर्तमानच्या वाचकांसाठी देत आहोत.**

**निमित्त**

**प्रविण मराठे**

कोरोनाचं मागच वर्ष सोडल तर पुन्हा एकदा गोमंतकात होणारी हवशी नाटक व राज्य नाट्य स्पर्धेतिल नाटकांचा धुमाकुळ सध्या जोरात सुरु आहे... स्पर्धेच्या निमित्ताने बऱ्याच संस्था उदयाला येतात ही एक आनंदाची गोस्ट. यात मराठी व्यावसाईक रंगभूमी वरती काम करणाऱ्या अवघ्या कहीचं संस्था गोव्यात आहेत. त्यातलिच एक संस्था म्हणजे नादब्रह्म सत्तरी जी मागची बरीचं वर्षे रंग भूमिची सेवा करीत, रंगमंचावर काम करीत तांत्रिक गोष्टि शिकण्याची संधी नवीन कलाकाराना देत आहे.

पुष्कळदा मला, सर सध्या काय चालू आहे तुमचं? मला तुमच्या सोबत नाटकात काम करायचंय... तुमचा ग्रुप जॉईन करायचाय तुमच्या बद्दल खूप एकलय ... एक संधि दयाल का?...वगैरे आशयाचे मेसेज मला बरेचदा येतात...जे अगोदर मि करायचो...मी जवळपास सगळ्यांना भेटायलाही बोलावतो. त्यांना विचारल, सध्या काय वाचताय? आवडलेलं (कोणत्याही भाषेतलं) पुस्तक कोणतं? याचं उत्तर एकतर नकारार्थी असतं, किंवा पॉप्युलर कल्चर मधले काही लेखक, ज्यावर पुढे काही बोलताच येत नाही, अशांची पुस्तक! मग सुरु होतात त्यांचे प्रश्न. तुम्ही आणखी कुणाचा नंबर देऊ शकाल का आम्हाला? शार्ट फ़िल्म किंवा वीडियो एल्बम करायचे आहे, त्यासाठी काही मार्गदर्शन मिळेल का? मग नाटकाचं काय? माझा भाबडा प्रश्न. करू की! पण बॅक स्टेज नाही, रोल असेल तर सांगा..! आणि मग नाटक तिथेच राहून जात....यांचा सगळाचं मुर्ख पणा.

मुळात नाटक म्हणजे काय? आणि त्याच गाम्भीर्य हे कितीजणांना माहीत असतं? हा माझा मूलभूत प्रश्न आहे. नाटकाकडे तुच्छ पणाने बघण्याचा दृष्टिकोन काही नवा नाही. माझ्या स्ट्रुगल काळातही अनेकजणांनी मला हा सल्ला दिला होता की, आता नाटक पुरे! आता जरा करियर कडे लक्ष द्या. नाटकात काही अर्थ नाही! टिव्ही किंवा सिनेमा करा. माझ्या कला अकादमीत नाट्य विद्यालयात जाण्याच्या निर्णयावरही घरचे आणि अनेकांचं म्हणणं असं होतं की, अरे यात तुझं तारुण्य जाणार! मग पुढे तुझं कसं होणार? पण आज समाजात जे कही माझ चांगल नाव आहे ते फक्त नाटकां मुळेचं..!!!

मुळात या सगळ्यांना मला विचारावंसं वाटतं, नाटकाचा कीडा तुम्हाला माहित आहे का? नाट्य सेवा करण्यामागच सुख हे स्वर्ग सुखाहुन ही जास्त असाव.मी सुरुवातीलाच सांगू इच्छितो की माझं टिवी किंवा सिनेमाशी अजिबात वैर नाही. पण यात दम नाही. प्रयोग चालू असताना प्रेक्षकांचा मिळणारा प्रतिसाद आणि टाल्या हे आपण टिवीत किंवा पडद्यावर नाही अनुभवू शकत. नाटक, सीरियल, सिनेमा ही सगळी सारखी वाटणारी माध्यमं वाटत असली, तरी त्यांच्यात काही मुलभूत फरक आहेत. नाटक म्हणजे फक्त एक संहिता घेऊन केलेला आविष्कार नसतो. त्यात व्यक्त होणं महत्त्वाचं असतं. आपल्या मराठीतही प्रायोगिक आणि व्यावसायिक अशा दोन प्रमुख धारा आहेत. खरंतर प्रायोगिक नाटकंही व्यावसायिकरीत्या केली जाऊ शकतात. यात व्यवसाय हा भाग महत्त्वाचा! आणि व्यावसायिक नाटकातही प्रयोगाला जागा असतेच की...!!!

नाटकत पैसे आहेत म्हणून, संहिता मिळाली की नाटक करण्याची गोष्ट नसते. एक कुठलीतरी गोष्ट असते जी सांगायची राहिलेली असते, कुठलातरी मुद्दा असतो (राजकीय, आर्थिक, काव्यात्म, नातेसंबंधावरील) त्याबद्दल बोलायचं असतं. कधी एखादा अनुभव घ्यायचा असतो, द्यायचा असतो. या सगळ्यासाठी नाटक करायचं असतं. आता आपल्यापैकी जवळपास सगळ्यांनी शाळा, महाविद्यालयात नाटकात काम केलेलं असतं. नाटकं बघितलेली असतात. अर्थात हा माझा अनुभव आहे.

गोव्यात नाटकाची संस्कृती आहे.ही परंपरा कितेक वर्षे आजही जपली गेली आहे. मागची अठरा वर्षे नाट्य क्षेत्रात काम करताना मी अशा अनेक तरुण मुलामुलींच्या आणि लोकांच्या संपर्कात मी आलो आहे, ज्यांना नाटकाचा 'न'ही माहीत नसतो, पण बाया मारण्यात एकदम तरबेज. काहीच्या मते तर धारावाहीक (सीरियल) मालिकांनाच नाटक म्हणतात. आणि नाटकातून पैसे कमवता येतात की नाही, हा सगळ्यांचाच प्रश्न असतो. जगण्यासाठी पैसा तर सर्वात आवश्यक! मराठीआणि कोकणी व्यावसायिक नाटकांमध्ये नक्की पैसा आहे. पण यात कला किती उरली आहे, हा चर्चेचा विषय आहे. हल्ली सिनेमा, टीवीतल्या कलाकारांना घेऊन नाटकं केली तरच चालतात, असा एक विचारप्रवाह आहे. या कलाकारांमुळे नाटक बघायला प्रेक्षक येतात तरी, ही जमेची बाजू. पण नाटक कला म्हणून त्यात किती वाढ होते हे माझ्या लक्षात येत नाही. प्रायोगिक नाटकांना प्रेक्षक येत नाहीत, ही बोंब सगळीकडेच आहे! नाटक आपल्या अवतीभवती घडतंय. पण याकडे बघण्याचा तरुणाईचा दृष्टिकोन जास्तीत जास्त व्यावसायिक होत चाललाय. ग्लेमर, पैसे, प्रसिद्धी ही सगळी नाट्यकलेची सहउत्पादनं आहेत अस मला वाटत. मुळात व्यक्त होणं ही गरज आहे. आणि नाटक करण्यापूर्वी हा विचार होणं गरजेचं आहे की आपल्याकडे व्यक्त करण्यासारखं काय आहे? काही आहे का? की फक्त प्रसिद्धीचा झगमगाट आहे?

आजकाल जागोजागी नाटकांच्या, अभिनयाच्या कार्यशाळा घेतल्या जातात. नाटकाचा, अभिनयाचा उपयोग आपल्या घडणुकी साठीही होतो. त्यामुळे असंख्य तऱ्हेचे लोक अशा कार्यशाळांना येतात. या प्रकारचे सर्व उपक्रम हे त्या त्या प्रदेशातील कलेच्या संवर्धनासाठी आवश्यक असतात. आणि सर्व प्रदेशांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीचं नाटक होतं हे समजून घेणं खूप गरजेचं आहे.

नाट्य प्रशिक्षण घेत असताना खूप वेळा मित्रमैत्रिणींत, आणि शिक्षकांबरोबरही वाद व्हायचे. मराठी रंगमंच हा अत्यंत व्यावसायिक असल्यामुळे त्याची वाढ खुंटलीये, असा माझ्या प्रतिपक्षाचा युक्तिवाद असायचा. जे विषय व्यावसायिकरीत्या चालू शकणार नाहीत, ते प्रायोगिक रंगमंचावर चालू असतात. आपण नाटकांच्या फॉर्म विषयी फार विचार करतच नाही. यात काही सन्माननीय अपवाद आहेत. जाऊदे कदाचित नाटकाच्या नावाने व मंत्र्यांच्या वरदहस्ता पाई काळा पैसा करण्याचा त्यांचा बेत असावा.

शेवटी मि इतकच म्हणेन कि जे प्रेक्षक नाटक बघतात, नाटक करू इच्छितात, ज्याना नाटकांची ओढ आहे त्यांना जोवर वेगळं काही बघायला मिळत नाही, तोवर नाटकांचा दर्जा वाढू शकणार नाही. मूळात जे चालू आहे, ते तसंच चालू ठेवूयात. वेगळं काही केलं तर नाटक चालणार नाही, हा युक्तिवाद मला मान्य नाही. प्रेक्षक अतिशय हुशार , संवेदनशील असतात, यावर माझा ठाम विश्वास आहे. आणि जे काम चालू आहे, ते चालूच राहणार आहे. त्यामुळे तरुणाईने पुढाकार घेऊन प्रयोगशील होण्याची गरज आहे. अभिनय, लाईट्स, मानधन, प्रसिद्धी, जाहिराती याउप्परही नाटक चार अंगुळे पुरून उरतं. नाटकाची गोडी काय आहे नाटक करणाऱ्यालांच समजेल. म्हणून नाटकांचा जे लोक द्वेष करतात त्यानी स्वतःच अगोदर आत्म परीक्षण एकदा करुन पहावचं नाटक हे माध्यम आहे कनेक्शनचं, जोडून घेण्याचं! आपले विचार मुक्त करण्याचं.. प्रेक्षकांबरोबर आणि स्वतःबरोबर ही!

